Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / November-December 2024 / VOL -01 ISSUE-III

13

# आजची शिक्षण पद्धती आणि वैदिक साहित्य

**डॉ. मयूर धनराज रवंदळे**
प्लॉट नंबर **23,**
बाळाप्पा कॉलनी**,** अशोक नगर जवळ**,** धुळे.

---

**प्रस्तावना :-**शिक्षणाचा विचार करतांना वेदांचे विचार पाहिल्याशिवाय पुढे पाऊल टाकणे अशक्य आहे. कारण वेद हा मानवी ज्ञानाचा मूळ झरा आहे. वेद हेच सर्वश्रेष्ठ साहित्य आहे. वेद हे आदिपुरुषांचे श्वास आहेत. आपल्या भारतीय धर्मातील तत्त्वज्ञानाचे, काव्याचे, इतिहासाचे व समाजव्यवस्थेचे वेद हेच मूलभूत सिद्धांत आहेत.

**विषय प्रवेश :-**भारतीय शिक्षणाचा स्वतंत्र असा इतिहास लिहिलेला नसला तरी देखील भारतीय शिक्षणाचे आगळे-वेगळेपण श्रुति, स्मृती, पुराणे, आख्यायिका यावरुन स्पष्ट होते. वेद, उपनिषदे, ब्राह्मण्ये, अरण्यके या प्राचीन संस्कृत ग्रंथात शिक्षणसूत्रे विपुल आहेत. ते सारे शिक्षण स्वरुपातच मोडतात.

**वेद :-**वेद उपनिषदांमधील ब्रह्मविद्या ही आपल्या हिंदु धर्माचा आत्मा आहे. वेदांविषयी सर्वांची प्रामाण्यबुद्धी आहे. म्हणून आपला हिंदुधर्म वेदशास्त्र पुराणोक्त असा म्हटला जातो. वैदिक साहित्य हे एकमेव राष्ट्रीयत्वाचेच बीज आहे आणि एकाच वेदांचे चार वेद झाले. त्यातून अनेक प्रकारची शास्त्रे, उपशास्त्रे व दर्शने झाली, उपनिषदे व पुराणे झाली. भारतीय साहित्यातील सर्व संतांनी वैदिक विचार अनुसरले आहेत. त्याकाळी परंपरागत ज्ञानाची गरज होती. त्यामुळे वेदशास्त्र व पुराणाच्या साहाय्याने आपण आत्मतत्त्व शोधून काढले. वेद हा सर्व साहित्याचा उगम आहे. वेद हे अनादि आहेत. वेदांमध्येच सर्वत्र परमात्मा व्यापून राहिला आहे. त्यामुळे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात कि,

"ओम नमोजी आदया।
वेद प्रतिवादया।
जय जय स्वयंविदया-आत्मस्था।।"[1]

वेदांनी जो अर्थ संक्षेपाने सांगितला तोच अर्थ उपनिषदांनी अधिक स्पष्ट करुन सांगितला. उपनिषदांमध्ये प्रतिपादन केलेल्या तत्त्वज्ञानावर दृष्टी टाकता जसे दिसून येते कि, त्यातील मूलभूत सिद्धांत दीर्घकाल चिंतन करुन ऋषींनी मांडलेले आहेत. उपनिषद तत्त्वज्ञानाचे भांडार आजही सर्व विद्वानांना खुले आहे.

वेदांच्या अभ्यासावरच मनुष्याची प्रगती, उन्नती निर्भर आहे. 'विद्येचे भांडार' असे वेदांचे वर्णन केले जाते. वेदांमध्ये विज्ञान आहे, उपदेश आहे, शिकवण आहे तसेच जीवन शिक्षणही आहे. वेदातील सर्व रचना ईश्वरोक्त असल्याचे सर्व प्रमाण आहेत.

आत्मज्ञान होणे, आत्मिक समाधान मिळणे हीच शिक्षणाची फलनिष्पत्ती असते. म्हणून वैदिक शिक्षणातून या आत्मतत्त्वाचे स्वरुप गुणधर्म एकत्व व अनेकत्व आपणास शिकायला भेटते. संहिताग्रंथ, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके व उपनिषदे या सर्वांनाच वेद ग्रंथ म्हणून महत्त्वाचे मानण्यात येते. या सर्वच वैदिक साहित्यात सर्व विद्यांची प्रतिष्ठा म्हणजेच आधारभूत अशी ब्रह्मविद्या व आत्मविद्या स्पष्ट केलेली आहे. वैदिक ज्ञानातूनच जीवनाचा उद्धार होत असतो. वेद हे आर्य धर्माच्या मूलस्थानी आहेत. 'वेदोखिलो धर्ममूल' हे प्रसिद्ध मनुवचन आहे. वेदांवरूनच आपणास तत्कालीन आर्य तत्त्वांच्या भौतिक उन्नतीची कल्पना येते. व्यक्ती समाज व राष्ट्र या तीन गोष्टींच्या माध्यमातूनच आर्यांनी भौतिक उत्कर्ष साधला होता. वेद सृष्टी, सदाचार व स्वत:च्या अंत:करणास जे बरे वाटेल ते अशी चार प्रकारची लक्षणे धर्मात महत्त्वाची आहेत. खऱ्या अर्थाने वेदांचे रक्षण करायचे असेल तर वेदांतील ऋचांचा उच्चार योग्य माणसाने योग्य वेळी व योग्य परिस्थितीत केल्याने त्यातील खरा अर्थ प्रकट होतो, असे सांगितले जाते. परंपरेने चालत आलेले हे ज्ञान आजवर सांभाळले गेले आहे. त्यामुळे हे ज्ञान आजदेखील महत्त्वाचे आहे.

वेद हे अनुभवावर रचलेले सिद्धांत असल्यामुळे त्यांना अधिकृत श्रुती मानले जाते. स्वामी विवेकानंद म्हणतात कि, "श्रुतींशिवाय इतर सर्व ग्रंथात बदल होणे शक्य आहे. फक्त वेद व उपनिषदांचे प्रामाण्य मात्र सर्वकालीन आहे."[6]

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / November-December 2024 / VOL -01 ISSUE-III

**उपनिषद :-**उपनिषदातील शौक्षणिक उदात्तता, भव्यता आणि व्यापकता आश्चर्यकारक आहे. उपनिषदातील शेकडो वचने ऋषीमुनींनी मनन, चिंतन करुन आत्मसाक्षात्काराचा अनुभव घेवून प्रस्थापित केलेली आहेत. उपनिषदांचा महिमा अनेकांनी स्पष्ट केलेला आहे. परंतु विनोबांनी म्हटल्याप्रमाणे, "उपनिषद हे प्रतिभादर्शन आहे. ऋषींनी प्रतिभेच्या सहाय्याने शब्दांत त्यांना आलेले अनुभव मांडण्याचा प्रयत्न केलेला असला तरी शब्द लटपटले आहेत. पण निष्ठा मात्र उमटली आहे. ती निष्ठा ह्दयात भरुन शब्द बाजूस सारुन अनुभव घ्यावा तेव्हाच उपनिषद समजते."[2]

उपनिषदातील बरेचसे शब्द गुढ असल्याचे दिसून येते. लहान-लहान शब्दात मोठे तत्त्वज्ञान स्पष्ट केलेले दिसून येते. वैदिक शिक्षण पद्धतीत गुरुंचे स्थान देखील महत्त्वाचे होते. पाचव्या वर्षीच प्राथमिक शिक्षणाचा प्रारंभ होत असे त्यास 'विद्यारंभ' किवा 'अक्षरस्त्रीकरण' असे नाव दिले जाई. त्यानंतर मुलांचा आठव्या वर्षी 'उपनयन' संस्कार होत असे. यात गुरूगृही  राहून पुढील शिक्षण घेण्यासाठी विदयाथ्र्यास परवानगी मिळत असे. मुलीदेखील वैदिक काळात गुरूगृही राहून अध्ययन पूर्ण करीत असत. वेदाचे अध्ययन पूर्ण झाल्यावर ब्रम्हचारी गुरुगृहातुन स्वगृही परत जाण्यास निघाले की त्यांच्यावर समावर्तन संस्कार करण्यात येई.

आचार्य विनोबा भावे यांनी वैदिक साहित्याचा सखोल अभ्यास केलेला आहे. वेद व उपनिषदे यावर स्वतंत्र भाष्ये करुन ऋगवेदसार शकराचार्यांच्या श्लोकांचे गुरुबोध', 'अष्टादशी' 'अठरा उपनिषदे' यांचे स्वतंत्र लिखाण वाचले तर विनोबांची नवी दृष्टी प्रत्ययास येते. विनोबा भावे म्हणतात कि, "भारतीय ऋषींनी शब्दब्रम्हाचा ठाव घेतला. त्यांचे जीवन ओमकाराचा स्निग्ध गंभीर घोष करीत आजही वेद उपनिषदांच्या रूपाने आम्हां जडजीवांना जागृत करीत आहे."[9]

'उपनिषदाचा अभ्यास' हे स्वतंत्र पुस्तक लिहून विनोबांची उपनिषदांकडे पाहण्याची दृष्टी कशी वेगळी आहे, हे यातून आपणास पाहण्यास मिळते. उपनिषदांचा महिमा अनेकांनी गायिला आहे. परंतू विनोबांच्याच शब्दात सांगावयाचे झाल्यास, "उपनिषद हे पुस्तकच नाही. ते एक प्रतिमादर्शन आहे. तत्त्वज्ञान शब्दात मांडण्याचा प्रयत्न केला तरी शब्द लटपटले आहेत. पण निष्ठा मात्र कायम आहे. ती निष्ठा ह्रदयात भरून आणि शब्दांच्या साहाय्याने शब्द बाजूस सारून अनुभव घ्यावा तेव्हाच उपनिषद उमगते. माझ्या जीवनात गीतेने आईचे स्थान घेतले आहे. पण मला माहित आहे कि उपनिषद ही माझ्या आईची आई आहे."[10]

**गुरूचे स्थान :-**गुरूला शिष्याच्या अध्यात्मिक पित्याचे महत्त्व दिले जात असे. त्यामुळे आईवडीलांपेक्षाही गुरू हे विदयार्थी / शिष्याच्या जीवनात अधिक महत्त्वाचे होते. "या कालखंडात वैदिक मंत्र, इतिहास, यज्ञकर्म, भूमिती, ज्योतिष या विषयाचे अध्यापन होत असे. नंतर नाराशंसी गाथा, मंत्रार्थ समजून घेणे, इतिहास, छंदशास्त्र, व्याकरण शास्त्र हे विषयदेखील शिकवले  जात असत. वेद विद्या, धनुर्वेद, आयुर्वेद, कायदा, ज्योतिष, नर्तन, वादन, चित्रकला, वास्तुशास्त्र हे विषयही तितकेच महत्त्वाचे होते. या काळात साहित्य, धर्मशास्त्र काव्य, पाणिनीची सूत्रे, अष्टधातू, गणित, कणादी सूत्रे या विषयांचे देखील अध्यापन होत असे."[3]

आपण वैदिक काळापासून भारतीय शिक्षणाचा इतिहास पाहिला तर भारतीय शिक्षणाचा सर्वंकर्ष विचार स्वातंत्र्यपूर्व काळात कुणीही जास्त केलेला नाही. प्राचीन काळामध्ये शिक्षण संस्था म्हणून गुरूकुल पद्धतीने संस्कृत पाठशाळा अस्तित्वात होत्या. तत्कालीन शिक्षणात वेद, ब्राम्हणे, अरण्यके, उपनिषदे इ. ग्रंथामधून तत्कालीन शिक्षणाची गुरुशिष्यांची विदयार्जनाची व अभ्यासक्रमाशी संबंधीत बरेच उल्लेख आहेत. परंतु स्वतंत्र असे लिखाण शिक्षणशास्त्र किंवा अध्यापनकला यासंबंधी आढळत नाही.

भारतीय शिक्षणात तत्त्वज्ञानाची बौठक आपणास दिसून येते. कोणत्याही देशाच्या तत्त्वज्ञानात त्या देशातील शिक्षणाची बीजे खोलवर रूजलेली दिसून येतात. पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा व विचारसरणीचा भारतीय शिक्षणावर कायमचा पगडा बसलेला दिसून येतो. त्यामुळे ब्रिटिश लोक निघून गेल्यानंतरही आपण इंग्रजी शिक्षण पद्धतीला अवास्तव महत्त्व दिलेले दिसून येते. याबद्दल युनिवर्सिटी कॉलेज ऑफ घाना मधील प्रोफेसर ऑफ एज्युकेशन म्हणून काम करत असलेले ॲडम कर्ल म्हणतात, "सामाजिक विकासाच्या गुंतागुंतीच्या समस्या परकीयांकडून विद्येची उसनवारी करून सुटत नसतात. हे कटाक्षाने लक्षात घेतले पाहिजे. दुर्देवाने एकीकडे स्वकीय संस्कृती जुनाट म्हणून ती तुच्छ लेखावयाची व त्याच वेळी राष्ट्राभिमानापोटी तिचा अत्यादर करावा असा दृष्टिकोन विकसनशील देशाने ठेवता कामा नये."[4]

त्यामुळे तत्त्वज्ञान, वाङ्मय, तौलनिक धर्मशास्त्र तसेच वैदिक शिक्षण विषयांना शिक्षणात स्थान मिळावे म्हणून प्रस्तुत संशोधनाची गरज आहे. भारतीय जीवनपद्धती व पाश्चात्य जीवनपद्धती मूलत: वेगळी असतानाही आपणास

©Copyright 2024 ADRJ. All Rights Reserved 

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / November-December 2024 / VOL -01 ISSUE-III

भारतीय जीवन पद्धतीचे वेगळेपण शिक्षणातून टिकवता आले नाही. आजही आपल्या देशात जीवनाचे तत्त्वज्ञान जीवनपद्धती तसेच प्रत्यक्ष शिक्षण यांचा भारतीय संदर्भातून पूर्णत: विचार केला जात नाही. सदर वरील गोष्टीचा विचार होण्यासाठी हे संशोधन गरजेचे वाटते. आपल्या शिक्षण प्रणालीतून आपण आजही एकसंघ राष्ट्रीय शिक्षण प्रणाली निर्माण करु शकलो नाही. दैनदिन जीवनातील जीवन कलह अधिक तीव्र होत आहे. तो कमी करुन मानवी जीवनात शांतता, सुख, आनंद प्राप्त करण्यासाठी आपण अध्यात्माची कास धरणे गरजेचे आहे, ज्यात वैदिक शिक्षण सहाय्यभूत ठरेल. त्यासाठी लागणारे समर्थ जीवन शिक्षण वेद व उपनिषदातील शैक्षणिक तत्त्वज्ञानातून मिळू शकेल.

**आजची शिक्षण पद्धती :-**आजची आधुनिक व साचेबंद शिक्षण पद्धती जीवनाच्या भौतिक गरजा भागवू शकते परंतू व्यक्तीला मन:शांती मिळवून देण्यास असमर्थ आहे. कारण हे शिक्षण अनुभूतीतून मिळत नाही. त्यामुळे अध्यात्मविद्या जाणून घेण्यासाठी वेद उपनिषदातील शिक्षण विचार समजून घेणे गरजेचे आहे. आपणास भारतीय संस्कृतीचा परिचय करुन घ्यावयाचा असेल तर त्यासाठी वैदिक शिक्षणाचा अभ्यास जाणून घेणे गरजेचे आहे. वैदिक साहित्य हे भारतीयांची अखंड विचारधारा आहे. कारण त्यातून भारतीय तत्त्वज्ञान उदयास आले. आपणास भारतीय शिक्षणाचा विचार करायचा असेल तर वैदिक शिक्षणाची परंपरा समजून घेणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. सर्वप्रथम वेदांमुळेच आत्मतत्त्वाची जाणीव झाली. त्यामुळे सर्व साहित्य व शिक्षणाचे मूळ वेद आहे. त्यानुसार भारतीय शिक्षणात जीवन शिक्षण देण्याची गरज आहे.

दैनंदिन शिक्षण पद्धतीत राष्ट्रीयता व भारतीय संस्कृती तसेच अध्यात्मिक शिक्षणास कुठेही वाव नाही. स्वातंत्र्यपुर्व काळात कोणतीही व्यक्ती संस्कृतीचे शिक्षण घेवू शकत नव्हती आणि त्यानंतर भारत स्वतंत्र झाला तर भारतीय आदर्श, भारतीय धर्म व संस्कृती या शिक्षणापेक्षा उपजीविकेचे साधन म्हणून जास्त शिक्षणाकडे पाहिले जाऊ लागले. यामुळे आजचे शिक्षण आत्मिक समाधान देवू शकत नाही. म्हणून शिक्षणांची पुर्नरचना होणे गरजेचे आहे. म्हणजेच काव्य, साहित्य, इतिहास, शास्त्र, परंपरा अभ्यासेतर उपक्रम यातुन शिक्षणात राष्ट्रीय एकात्मता आणण्यासाठी शिक्षण आज गरजेचे वाटते. प्रत्येक भारतीयांनी वेद व उपनिषदांचा अभ्यास करण्याची गरज आहे. म्हणजे पाश्चात्य शिक्षणपद्धतीबरोबर भारतीय संस्कृती व राष्ट्रीयतेचा विचार शिक्षणात समाविष्ट करणे गरजेचे आहे. वेदविदयेसंदर्भात लिहिताना महाराष्ट्रीय ज्ञानकोशात डॉ. केतकर लिहितात की, "सर्व विद्यांचा उगम वेदविद्या होत. हे विधान इतके खरे आहे कि त्यावर अधिक लिहीणे नकोच."[5]

वेदाच्या निर्मितीबरोबर भारतीय ज्ञानाचे संवर्धन सुरु झाले. भारतीय लोकांच्या शिक्षण विचारास देखील वेदांमुळेच महत्त्व प्राप्त झाले. वेद' या शब्दाचा अर्थच 'ज्ञान' असल्यामुळे वैदिक साहित्यातील ज्ञानाचा शिक्षणाचा विचार जाणणे ही संशोधनाची गरज आहे. जगातील आत्मविद्येचा मूळ साठा हा उपनिषदांमध्ये व वेदांमध्ये आढळून येतो. भारतीयांचा भारतीयपणा देखील उपनिषदांमध्ये व वैदिक शिक्षणात केंद्रित झालेला आहे. त्यामुळे वैदिक शिक्षणाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. कारण शिक्षण व संस्कृती नेहमी हातात हात धरुनच वावरत असतात. वैदिक शिक्षणाच्या अभ्यासाने अविद्येचा नाश होवून जीवन आनंदमय होण्यास मदत होते. त्यामुळे वैदिक शिक्षणाचा अभ्यास हा गरजेचा वाटतो. आत्मज्ञान होणे हेच शिक्षणाचे खरे उद्दिष्ट असते जे आपणास वैदिक शिक्षणपद्धतीत पाहावयास मिळते. वेदांमध्ये ठिकठिकाणी मांडलेल्या सिद्धांतात आत्मज्ञानास महत्त्व दिलेले दिसून येते.

ब्रम्हविद्येचे शिक्षण देणारी ऋषीकुले मोठमोठी होती. या ऋषीकुलांतून शिक्षणाचा प्रसार चांगल्याप्रकारे झालेला दिसून येतो. त्याचे स्वरुप समजावून घेण्यासाठी तत्कालीन विचारांचा आधुनिक शिक्षणाशी काही संबंध आहे का ? त्यांची वौशिष्टे कोणती हे तपासून पाहण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे. संत तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे,

"वेद अनंत बोलिला। अर्थ इतुकाचि लाविला।
विठोबासी शरण जावे। निजनिष्ठे नाम गावे ।।
सकळ शास्त्रांचा विचार। अंति इतकाची निधीर।
अठरा पुराणी सिद्धांत। तुका म्हणे हाची हेत ।।"[7]

वेदशास्त्र पुराणादिकांच्या ओघाने आलेला विचारप्रवाह प्रत्यक्ष भारतीय शिक्षणातून वाहत असल्याचे दिसून येते. वेदशास्त्रातील कर्मकांडाचा भाग वगळता इतर सर्व विचार स्वीकारणे म्हणजे वेदांचे प्रामाण्य मानणे होय. उपनिषदांना प्रामुख्याने ज्ञानकांडाचे स्वरूप आहे. जे वेदप्रामाण्यवादी आहेत त्यांनी त्यांचा नीट अभ्यास करुन ते समजावून घेणे गरजेचे

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / November-December 2024 / VOL -01 ISSUE-III

आहे. त्याशिवाय प्राचीन भारतीय शिक्षणाचा विचार कळणार नाही. गीता हे देखील एक उपनिषद् आहे. त्यात वेदांचे वर्णन केले आहे ते असे-"प्रामाण्यबुद्धी वेदेषु साधनाना अनेकता / उपास्थाना अनियमा एतद् ज्ञानस्य लक्षणम।।"[8]

सदर ओळींमध्ये अनेकतेला पूर्ण अवकाश देवून ज्ञानाचा प्रारंभ वेदापासून झालेला आहे. हे तत्त्व महत्त्वाचे मानलेले दिसून येते. वेदांचे प्रामाण्य सर्वांसाठी समान आहे. असे मानुन सर्व ज्ञानाची उपासना करणाऱ्यांना एकाच ठिकाणी आणण्याचा वेदांनी प्रयत्न केलेला दिसून येतो. वेद हे आपल्या पूर्तीचे निदान आहेत. वेदांमध्ये कुठलेही पाठभेद नाहीत म्हणून त्यांना प्रमाण मानणे महत्त्वाचे आहे.

ज्ञान कर्म व उपासना तसेच जीवनातील आवश्यक व्यावहारिकता यांनी वेदवाणी पूर्णपणे भरलेली आहे. त्याचाच प्रभाव भारतीय शिक्षणावर चांगल्या प्रकारे पडलेला दिसून येतो. वेद उपनिषदांचे विस्मरण म्हणजेच सत्य व ज्ञानाची उपेक्षा केल्यासारखेच होय. परंतू हे तथ्य आपणास समजले तरच आपण वैदिक काळातील शिक्षणाचा विचार करू शकतो. वेदांच्या प्रकाश किरणांनी अज्ञानरूपी अंधकार नेहमीच नाहीसा होतो. वेद या शब्दाचा अर्थच मुळात ज्ञान हा आहे. वेद सांगत आहेत कि, 'तत्वमसि' तू चैतन्यमय आहेस', हे ज्याला कळले त्याने वेद जाणले आणि त्याला ज्ञानदेखील प्राप्त झाले. म्हणून वैदिक शिक्षणपद्धती महत्त्वाची आहे.

**प्राचीन भारतातील शिक्षणाचे पुनरुज्जीवन :-** प्राचीन भारतातील शिक्षणाचे पुनरुज्जीवन सर्वदृष्टींनी आधुनिक काळात शक्य नाही परंतु त्यातील अंतर्भूत तत्त्वे आपण केव्हाही अंमलात आणू शकतो. त्यामुळे आधुनिक शिक्षणाचे पुढील पाऊल नीट पडू शकते. वेद व उपनिषदे हा भारतीय शिक्षणाचा मूल स्त्रोत असून देखील त्यातील शैक्षणिक विचारांना कोणी फारसे महत्त्व दिलेले दिसून येत नाही. त्यासाठी सदर संशोधनाची गरज भासते. महात्मा गांधींनी राष्ट्रीय 'शिक्षण' किंवा 'जीवन शिक्षण' यासारखे शैक्षणिक विचार राष्ट्रापुढे मांडले तरी देखील त्याची अंमलबजावणी व्यवस्थित झालेली नव्हती. त्यामुळे भारतीय शिक्षण हे व्यक्तीचे जीवन घडवण्यास बहुधा असमर्थ ठरले. आजही शिक्षण व जीवनाची सांगड व्यवस्थित घातली जात नाही हे कटू सत्य आहे. त्यामुळे राष्ट्रीय उद्दिष्टांची परिवर्ती करण्यासाठी वेदांतातील विचारसरणीचे अनुसरण करणे देखील गरजेचे वाटते. विज्ञान शिक्षणाबरोबर धार्मिक शिक्षणातून नैतिक व अध्यात्मिक मूल्यांचा पुरस्कार करणे गरजेचे आहे कारण 'आत्मज्ञान हेच खरे शिक्षण आहे'.

**निष्कर्ष :-**वेदकालीन शिक्षणपद्धती ही आदर्श विद्यार्थी घडविणारी व व्यक्तीचे जीवन परिपुष्ट करणारी भारतीय शिक्षण व्यवस्था होती. वेदकालीन शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट 'मोक्षप्राप्ती' हे होते. अध्यात्मिक अधिष्ठान हा शिक्षण पद्धतीचा पाया होता तर आत्मज्ञान हे शिक्षणाचे कार्य होते. ज्ञानाचा अर्थ 'आत्मबोध' किंवा स्वत: अंतर्मुख होवून ब्रम्हाची ओळख करुन घेणे हा होता. 'परा विद्या' व 'अपरा विद्या' हे दोन प्रमुख प्रकार विद्येचे होते. वैदिक शिक्षण पद्धतीत गुरूशिष्य संबंध अतिशय जिव्हाळयाचे प्रेमाचे व जवळीकतेचे होते. वैदिक शिक्षण पद्धतीतील अभ्यासक्रम विकेंद्रीत स्वरूपाचा होता. शिक्षण हे सुखी जीवनाचे साधन होते व शिक्षण घेवून मनाशांती मिळत होती.

**संदर्भ :-**

1. ज्ञानेश्वरी अध्याय 1 ओवी 1
2. विवेकानंद स्वामी, समर्थ ग्रंथ, पान नं. 37
3. भावे विनोबा, उपनिषदांचा अभ्यास, प्रस्तावना पान क्र. 01
4. अष्टादशी, विनोबा प्रस्तावनेतील दोन शब्द, पान नं. 05
5. भावे विनोबा, उपनिषदांचा अभ्यास, प्रस्तावनेतून, पान नं. 01
6. अळतेकर ए. एस. (डॉ.), प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती, पान क्र. 67
7. कर्ल ॲडम, मागास देशाच्या विकासात शिक्षणाचे स्थान, पान क्र . 40
8. केतकर श्री. व्यं. (डॉ.), महाराष्ट्रीय ज्ञानकोश, प्रस्तावना खंड, पान क्र. 03
9. संत तुकाराम, अभंग क्रं – 4069
10. श्रीमद्भगवत्गीता, अध्याय 16 श्लोक 24